# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या १७२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## शुक्रवार, दि. १९ एप्रिल, २०२४ दुपारी १२:३० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १७२ वी बैठक **शुक्रवार, दि.१९ एप्रिल, २०२४ रोजी दुपारी १२:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ). प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ११) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | अनुपस्थित |
| १७) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | ऑनलाईन उपस्थित |
| १८) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील व डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज यांनी दूरध्वनीद्वारे अनुपस्थिती कळविली होती, त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | दि. २२ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७१ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि. २२ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७१ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **Harmal Panchakroshi shikshan mandal's Ganpat Parsekar College of Education, Harmal, Pernem, Goa व प्रस्तुत विद्यापीठाचा सामंजस्य करार व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**<br>टिपणी: Harmal Panchakroshi shikshan mandal's Ganpat Parsekar College of Education, Harmal, Pernem, Goa या महाविद्यालयात दि.११ व १२ जानेवारी, २०२४ रोजी International conference on "Educate, Empower and Transform: Sustainable Development Goal ४ - Quality Education" आयोजित करण्यात आलेली होती. या आंतरराष्ट्रीय परिषदेत महाराष्ट्रातील विद्यापीठांना ते Participating University म्हणून सहभागी होण्यासाठी आवाहन केले होते. महाराष्ट्रातील शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या विद्यापीठाबरोबर आपल्या विद्यापीठास Participating University म्हणून सहभागी होण्यास मा. कुलगुरु महोदय यांनी मान्यता दिलेली होती. त्याचबरोबर आपल्या विद्यापीठाशी Memorandum of Understanding (MoU) देखील करण्यास इच्छुक असल्याचे कळविले होते. त्यानुसार MoU चा मसुदा MoU सेलच्या दि.०२ जानेवारी, २०२४ रोजीच्या बैठकीत मान्य झाला असून, दि.११ जानेवारी, २०२४ रोजी या महाविद्यालयांशी विद्यापीठाचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. दरम्यानच्या काळात विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्याने नजरचुकीने सदरची बाब व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवायची राहून गेले आहे.<br>सबब, Harmal Panchakroshi shikshan mandal's Ganpat Parsekar College of Education, Harmal, Pernem, Goa व प्रस्तुत विद्यापीठाचा सामंजस्य करार झालेला असून, सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव | आयक्युएसी विभाग |
| ठराव: | **Harmal Panchakroshi shikshan mandal's Ganpat Parsekar College of Education, Harmal, Pernem, Goa व प्रस्तुत विद्यापीठाचा सामंजस्य करार झाल्याची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **ब्रम्हदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बेलाटी, ता. उत्तर सोलापूर या महाविद्यालयातील बी. टेक. (मेकॅनिकल इंजिनिअरींग) या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून टप्प्याटप्याने १२० वरुन ३० इतकी कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.** | संलग्नता विभाग |

टिपणी: मा. प्राचार्य ब्रम्हदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बेलाटी, ता. उत्तर सोलापूर या महाविद्यालयातील बी. टेक. (मेकॅनिकल इंजिनिअरींग) भाग १ या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून १२० वरुन ३० करण्याबाबत विहित शुल्कासह प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव | अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेतील घट (Reduction in Intake) | प्रवेशक्षमता कमी करावयाचे वर्ष | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| कै. आमदार ब्रम्हदेवदादा माने शिक्षण व सामाजिक प्रतिष्ठान, बेलाटी, सोलापूर | ब्रम्हदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बेलाटी, ता. उत्तर सोलापूर | बी. टेक. (मेकॅनिकल इंजिनिअरींग) प्रवेशक्षमता घट ९० [१२०-९० = ३०] | शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून | कायम विनाअनुदानित |

मा. प्राचार्य, ब्रम्हदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बेलाटी, ता. उत्तर सोलापूर या महाविद्यालयातील बी. टेक (मेकॅनिकल इंजिनिअरींग) या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून ६० वरुन ९० (६० + ३० = ९०) व शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून ९० वरुन १२० (९० + ३० = १२०) अशाप्रकारे अनुक्रमे वाढीव विद्यार्थी प्रवेशक्षमतेस AICTE, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची मान्यता मिळाली होती. सदर मान्यतेच्या अनुषंगाने व स्थानिक चौकशी समितीच्या शिफारशीस अनुसरुन त्या-त्या शैक्षणिक वर्षापासून वाढीव विद्यार्थी प्रवेशक्षमतेच्या प्रथम संलग्निकरणास कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली होती.

परंतू, महाविद्यालयातील बी.टेक (मेकॅनिकल इंजिनिअरींग) या अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांची मागणी कमी असल्यामुळे विद्यार्थी प्रवेश संख्ये अभावी संस्थेने १२० वरुन ३० इतका करण्याचा निर्णय घेतला असून तसा ठराव पारित करण्यात असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमूद केले आहे.

प्राप्त प्रस्तावासंदर्भात संबंधित महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकामी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१ मधील तरतूदीनूसार दि. २५/०९/२०२३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. ४० नुसार खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१) डॉ. पी. एम. पवार (अध्यक्ष)
२) डॉ. बी. बी. देशमुख (सदस्य)
३) डॉ. ए. बी. कोकरे (सदस्य)

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देवून सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने महाविद्यालयातील बी. टेक (मेकॅनिकल इंजिनिअरींग) भाग १ या अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता १२० वरुन ३० इतकी कमी करण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून मान्यता देण्यासंदर्भात शिफारस केलेली आहे.

सदर अहवालानुसार बी. टेक (मेकॅनिकल इंजिनिअरींग) या पदवी अभ्यासक्रमाची शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Course | Year | Sanctioned Intake | Actual Admission |
|---|---|---|---|---|
| 1 | Reduction in INtake Mechanical Engineering A. Y. 2024-25 | 1st Year | 120 | 10 |
| 2 | | 2nd Year | 120 | 47 |
| 3 | | 3rd Year | 120 | 27 |
| 4 | | 4th Year | 120 | 49 |

बी. टेक. (मेकॅनिकल इंजिनिअरींग) या पदवी अभ्यासक्रमाची शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील वरीलप्रमाणे प्रवेशित विद्यार्थ्यांची स्थिती पाहता, सदर अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून टप्प्याटप्याने १२० वरुन ३० इतकी कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करावे लागणार आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE), नवी दिल्ली यांचे (Public Notice for Approval Process व Approval Process Handbook) नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणातंर्गत येणारे महाविद्यालय, अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी (विद्यार्थी प्रवेशक्षमता कमी करणे) बंद करण्याबाबत प्रस्ताव सादर करतेवेळी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रस्तावासोबत AICTE कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी प्रथमत: विद्यापरिषदेची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे. यास्तव ब्रम्हदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बेलाटी या महाविद्यालयातील बी. टेक. (मेकॅनिकल इंजिनिअरींग) या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून टप्प्याटप्याने १२० वरुन ३० इतकी कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्यापरिषदेची व्यवस्थापन परिषदेला शिफारस असणे आवश्यक आहे.

तथापि, विद्यापरिषदेची बैठक दि.२२/१२/२०२३ रोजी संपन्न झाली असून नजीकच्या काळात लवकर आयोजित होण्याची शक्यता नसल्याने व तसेच AICTE, नवी दिल्ली यांचे Public Notice for Approval Process २०२४-२५ नुसार, AICTE च्या पोर्टलवर प्रस्ताव सादर करणेकामी प्रस्तुत विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र दि.३१/०१/२०२४ पूर्वी संबंधीत महाविद्यालयास निर्गमित करणे अनिवार्य असल्याने वेळेअभावी तातडीची बाब असल्याने मा. कुलगुरुमहोदयांनी त्यांच्या प्राप्त अधिकारात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) मधील तरतूदीनुसार विद्यापरिषदेच्या वतीने व व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. सदरची बाब दि.१८/०४/२०२४ रोजी होणाऱ्या विद्यापरिषदेच्या बैठकीत माहितीस्तव सादर करण्यात आली आहे.

सबब, ब्रम्हदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बेलाटी, ता. उत्तर सोलापूर या महाविद्यालयातील बी. टेक. (मेकॅनिकल इंजिनिअरींग) या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून टप्प्याटप्याने १२० वरुन ३० इतकी कमी करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

**ठराव:** **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०४ ]</td><td>प्रस्तुत विद्यापीठातील जैवविज्ञान संकुलातंर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून M.Sc. Biotechnology हा पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह नव्याने सुरु करण्यास विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.<br><br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३(१)(च) व (यक) मध्ये पदव्या, पदविका प्रमाणपत्रे आणि इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरु करण्यासंबंधी व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्याची तरतूद आहे.<br><br>मा. संचालक, जैवविज्ञान संकुल, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा जैवविज्ञान संकुलातंर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून M.Sc. Biotechnology हा पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह सुरु करण्याचा मानस होता, ही बाब लक्षात घेता M.Sc. Biotechnology हा पदव्युत्तर अभ्यासक्रम Microbiology व Bioinformatics या अभ्यासक्रमाप्रमाणे शुल्क आकारण्यास व २० विद्यार्थी क्षमतेसह शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये सुरु करण्याची बाब विद्यापरिषदेच्या बैठकीत विषय क्र.३५ नुसार सादर केला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.<br><br><table><tr><td>ठराव क्र.३५</td><td>प्रस्तुत विद्यापीठातील जैवविज्ञान संकुलातंर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून M.Sc. Biotechnology हा पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह नव्याने सुरु करण्यास सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली.</td></tr></table><br>सबब, प्रस्तुत विद्यापीठातील जैवविज्ञान संकुलांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून M.Sc. Biotechnology हा पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह नव्याने सुरु करण्यास विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.</td><td>जैवविज्ञान संकुल</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>प्रस्तुत विद्यापीठातील जैवविज्ञान संकुलातंर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून M.Sc. Biotechnology हा पदव्युत्तर अभ्यासक्रम २० प्रवेश क्षमतेसह नव्याने सुरु करण्यास विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सदरचा अभ्यासक्रम सुरु झाला असल्याने त्यास सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **डॉ. सौ. एम. जे. पाटील, सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल यांना विद्यापीठ परिसर संकुलातील नियमित शिक्षकांना लागू असलेले परिनियम क्र. २७२ [e(B)(a)&(i)] नुसार दि. ०१/०४/२०२४ ते ३०/०४/२०२४ अशी एकूण ३० दिवसांची विनावेतन असाधारण रजा (Extraordinary Leave) मंजूर करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: डॉ. सौ. एम. जे. पाटील, सहायक प्राध्यापक तथा विभागप्रमुख, प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र, सामाजिकशास्त्रे संकुल यांनी दि.१६/०३/२०२४ रोजीच्या अर्जान्वये माझी मुलगी ऋतुप्रिया पाटील अमेरिकेत सॅन-होजे या ठिकाणी एरोस्पेस इंजिनिअर म्हणून काम करीत आहे. सध्या ती गर्भवती असून एप्रिल महिन्याच्या शेवटी ती आई होणे अपेक्षित आहे. माझ्या मुलीची काळजी घेण्यासाठी अमेरिकेत कोणीही नाही. आई या नात्याने मला त्यावेळेस तिच्या जवळ असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी मला दि.०१/०४/२०२४ ते ३०/०४/२०२४ अखेर विशेष रजा मंजूर करावी अशी विनंती केली आहे. तसेच दि.०१ एप्रिल, २०२४ ते ३० एप्रिल, २०२४ अखेर विशेष रजा मंजूर करताना माझ्याकडे कार्यालयीन रजा शिल्लक नसल्यास बिनपगारी रजा केल्यास माझी काही हरकत असणार नाही, असे कळविले आहे.<br>संबंधितांच्या मूळ सेवापुस्तिकेचे अवलोकन केले असता, डॉ. सौ. एम. जे. पाटील यांनी मागणी केल्याप्रमाणे ३० रजा सेवापुस्तिकेत शिल्लक नाहीत. विद्यापीठ परिसरातील नियमित पदावर कार्यरत असलेल्या शिक्षकांना लागू असलेला परिनियम क्र.२७२ [e(B)(a)&(i)] असाधारण रजा (Extraordinary Leave) नुसार जर एखाद्या नियमित अध्यापकाच्या खाती कोणत्याही प्रकारची रजा शिल्लक नसेल तर वैद्यकीय कारणास्तव वा इतर वैयक्तिक कारणास्तव व्यवस्थापन परिषदेच्या पूर्व परवानगीने असाधारण रजा विनावेतन उपभोगता येऊ शकते अशी तरतूद आहे.<br>सबब, उपरोक्त तरतूदीनुसार डॉ. सौ. एम. जे. पाटील यांना दि.०१/०४/२०२४ ते ३०/०४/२०२४ एकूण ३० दिवसांची खासबाब म्हणून वैयक्तिक कारणास्तव बिनपगारी विशेष रजा मंजूर करुन, संबंधितांचे माहे एप्रिल-२०२४ चे वेतन कपात करणेबाबत वित्त व लेखा विभागास कळविण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **डॉ. सौ. एम. जे. पाटील, सहायक प्राध्यापक, सामाजिकशास्त्रे संकुल यांना विद्यापीठ परिसर संकुलातील नियमित शिक्षकांना लागू असलेले परिनियम क्र. २७२ [e(B)(a)&(i)] नुसार दि. ०१/०४/२०२४ ते ३०/०४/२०२४ अशी एकूण ३० दिवसांची विनावेतन असाधारण रजा (Extraordinary Leave) मंजूर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | **विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२२ -२३ चा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेला १९ वा वार्षिक अहवाल विचारार्थ.** | सांख्यिकी विभाग |

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३६(१) नुसार व्यवस्थापन परिषदेने वार्षिक अहवाल स्विकारणे आणि ते अधिसभेकडे पाठविणे अशी तरतूद आहे.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा १९ वा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | डॉ. इ. जा. तांबोळी | अध्यक्ष |
| २ | प्रा. गंगाधर बिराजदार | सदस्य |
| ३ | प्रा. अप्पासाहेब डोणे | सदस्य |
| ४ | प्रा. डॉ. प्रभाकर कोळेकर | सदस्य |
| ५ | प्रा. ॲड श्रीमती अर्चना जोशी | सदस्य |
| ६ | श्री. मुकतार म. शेख | सदस्य - सचिव |

उक्त समितीने महाविद्यालये, विद्यापीठ संकुले व प्रशासकीय विभागाकडून मागवून घेतलेल्या माहितीवर एकत्रित विचार करुन वेळोवेळी अहवाल समितीच्या बैठका आयोजित करुन सदरचा मराठी व इंग्रजी भाषेतील अहवाल (पुस्तक स्वरुपात) तयार करुन अधिष्ठाता मंडळाच्या दि. १८/०३/२०२४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ४ नुसार, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा १९ वा वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेकडे सादर करण्याची शिफारस केलेली आहे. व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशी नंतर सदरच्या अहवालास अधिसभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३६(१) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कलम १३६(१) | अधिष्ठाता मंडळ, प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठ, त्याच्या अधिकारितेतील महाविद्यालये व परिसंस्था यांचे प्रशासनिक, विद्याविषयक संशोधन व विकासविषयक व अन्य कार्यक्रम समाविष्ट असलेला वार्षिक अहवाल तयार करील व तो विचारार्थ व्यवस्थापन परिषदेला सादर करील. व्यवस्थापन परिषदेकडून मिळालेल्या वार्षिक अहवालावर अधिसभा चर्चा करील व तो मान्य करील. अधिसभेने मान्य केलेला असा अहवाल, कुलपती व राज्य शासन यांना शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर एका वर्षाच्या आत सादर करण्यात येईल. |

सबब, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक व सी. डी. स्वरुपात) तयार केलेला १९ वा वार्षिक अहवाल विचारार्थ.

**ठराव:** **विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२२ -२३ चा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेला १९ वा वार्षिक अहवालाबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन व्यवस्थापन परिषद सदस्यांकडून अहवालावर दि. १० मे, २०२४ पर्यंत दुरुस्त्या मागवून, प्राप्त झालेल्या दुरुस्तीसह अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.**

**मात्र पुढील वर्षी वार्षिक अहवाल तयार करण्यापूर्वी महाविद्यालये / संकुले यांच्याकडून माहिती मागविण्याचे तक्ते शासन निर्देशानुसार नव्याने बनविण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.**

| अ.क्र | समिती सदस्यांची नांवे | पद |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ). लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु | अध्यक्ष |
| २. | डॉ. प्रशांत मारुती पवार, प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ३. | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे, प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| ४. | डॉ. वसंत गुरुशांत कोरे, प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ५. | डॉ. राजशेखर हिरेमठ, प्र.अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| ६. | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य |
| ७. | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(१)] | ICAR-Indian Institute of Millets Research आणि Seema Biotech Pvt. Ltd, सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराचा मसुदा व करार करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: ICAR-Indian Institute of Millets Research आणि Seema Biotech Pvt. Ltd व जैवविज्ञान संकुल यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात येणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना Internship, Job Placement, Collaboration साठी फायदा होणार आहे. सदर सामंजस्य कराराचा मसुदा नवोपक्रम, नवसंशोधन व सहचर्य मंडळ या विभागाकडील MoU Committee कडून तपासून घेतला असून, सदर सामंजस्य करार करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१(झ) नुसार व्यवस्थापन परिषदेसाठी मान्यता घ्यावी लागणार आहे.<br>सबब, सदर सामंजस्य कराराचा मसुदा व कराराची बाब विचारार्थ. | जैवविज्ञान संकुल |
| ठराव: | ICAR-Indian Institute of Millets Research आणि Seema Biotech Pvt. Ltd, सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराच्या मसुद्यामध्ये दुरुस्त्या करुन सदरचा विषय पुनश्च: सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(२)] | **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालय सुरू करणेकामी अंतिम इरादापत्र मिळणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त प्रस्तावांची दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३.१ ते ३.१२ ची कार्यवाही पूर्ण झालेली असून सदरील प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९(३)(च) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मंजूरीसह राज्य शासनाकडे पाठविण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून प्रस्तावित नवीन महाविद्यालय (इरादापत्र मिळणेबाबत) सुरु करणेबाबत स्थळबिंदू निश्चितीनुसार रितसर १४ प्रस्ताव प्राप्त झाले होते. सदर प्राप्त प्रस्तावांवर दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार विहीत कार्यवाही पूर्ण करुन ०९ पात्र प्रस्ताव विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२३-२४/८६८८, दि.२६/१२/२०२३ अन्वये शासनास सादर करण्यात आले होते.<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासंदर्भात इरादापत्र मिळणेबाबतच्या प्रस्तावांची दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाच्या परिशिष्ट - ब मध्ये इरादापत्र देण्यासंदर्भात विहित करण्यात आलेल्या निकषानुसार सदर प्रस्तावांची शासन स्तरावर तपासणी करण्यात येवून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ २०१६ मधील कलम १०९ (३) (घ) नुसार व दि.१५/०२/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनास असलेल्या अधिकारांचा वापर करून प्रस्तुत विद्यापीठासाठी ०५ प्रस्तावित महाविद्यालयांना कायम विना अनुदानित तत्वावर नवीन महाविद्यालय सुरु करणेकामी इरादापत्र मंजूर झाले आहे.<br>उपरोक्त ज्या पात्र संस्थास शासनाकडून इरादापत्र देण्यात आले आहे. त्या संस्थानी अंतिम इरादापत्र मिळणेबाबतचे प्रस्ताव विद्यापीठास सादर करणेबाबत ओदशित केल्यानुसार दि.१२/०३/२०२४ पर्यंत प्रस्ताव स्विकारण्यात आलेले होते. त्यानुसार प्राप्त ०५ प्रस्तावांची छाननी करण्याकामी छाननी समिती गठीत करण्यात आली होती.<br>महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३.४ च्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या छाननी समितीच्या बैठका दि.०१/०४/२०२४ व ०५/०४/२०२४ रोजी डॉ. पी. एम. पवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर सर्व छाननी समितीच्या बैठकांचे अहवाल सोबत जोडले आहेत. | संलग्नता विभाग |

| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३.९ च्या अनुषंगाने महाविद्यालयांस प्रत्यक्ष भेट देवून अहवाल सादर करणेबाबत मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या तज्ज्ञ समित्यांचे (Spot Visit) अहवाल सोबत जोडले आहेत.<br>वरीलप्रमाणे छाननी समिती व तज्ज्ञ समित्यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.३.९ अन्वये दि.१६/०४/२०२४ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.५ (७) अन्वये अहवाल स्विकारुन मा. कुलगुरु महोदयांना शिफारस केली आहे. सदरील अहवालांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे.<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (३) (च) व दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.३.१३ अन्वये सदरील ०५ पात्र प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या मंजूरीसह शासनाकडे ०१ मे किंवा त्यापूर्वी सादर करणे आवश्यक आहे.<br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालय सुरु करणेकामी अंतिम इरादापत्र मिळणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त प्रस्तावांची दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३.१ ते ३.१२ ची कार्यवाही पूर्ण झालेली असून सदरील प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (३) (च) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मंजूरीसह राज्य शासनाकडे पाठविण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालय सुरु करणेकामी अंतिम इरादापत्र मिळणेबाबत विविध संस्थाकडून प्राप्त प्रस्तावांची दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३.१ ते ३.१२ ची कार्यवाही पूर्ण झालेली असून सदरील प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९(३)(च) अन्वये राज्य शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच यापुढे विद्यापीठात परिसरातील संकुलात नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याची सर्व कार्यालयीन प्रक्रिया संलग्नता विभागामार्फत करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(३)] | **छोट्या संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती (सरळसेवा) बाबतचा सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक: बीसीसी - २०२१ / प्र.क्र.७७ / १६ क, दि.०६/०३/२०२४ माहितीस्तव.**<br>टिपणी: उक्त शासन परिपत्रकान्वये सामान्य प्रशासन विभागाकडून बिगर आदिवासी जिल्हायांसाठी छोट्या संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती (सरळसेवा) कशी असावी, याबाबतच्या सूचना उक्त शासन निर्णयान्वये कळविले आहे.<br>यावाबत सादर करण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शेक्षणिक दृष्टया मागास (एसईबीसी) वर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ (सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१६) अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग निर्माण करण्यात आला आहे. तसेच दि.२७/०२/२०२४ च्या शासन निर्णयान्वये सामाजिक आणि मागास वर्गाकरिता आरक्षणाच्या तरतूदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदूनामावली विहित करण्यात आली आहे.<br>राज्यातील बिगर आदिवासी जिल्हायांसाठी छोट्या संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती (सरळसेवा) सोबत जोडलेल्या अनुसूची मध्ये विहित करण्यात आले आहे. तसेच सरळसेवा भरती संदर्भातील सूचना विचारात घेऊन सोबत जोडलेल्या अनुसूची नुसार कार्यवाही करावी, असे कळविले आहे.<br>सबब, छोट्या संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती (सरळसेवा) बाबतचा सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक:बीसीसी-२०२१/प्र.क्र.७७/१६क, दि.०६/०३/२०२४ माहितीस्तव. | विशेष कक्ष विभाग |
| ठराव: | **छोट्या संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती (सरळसेवा) बाबत सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक: बीसीसी-२०२१/प्र.क्र.७७/१६ क, दि.०६/०३/२०२४ ची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(४)] | **अध्यापक पदभरती करताना दिव्यांगाकरिता समांतर आरक्षणाची अंमलबजावणी करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे परिपत्रक क्र. संकिर्ण २०२४/ई ७२२५५०/विशि-१, दि.२९/०१/२०२४ माहितीस्तव.**<br>टिपणी: उक्त शासन परिपत्रकान्वये सामान्य प्रशासन विभागाकडून पदभरतीकरिता सामाजिक आरक्षण तपासून देण्यात येते. समांतर आरक्षणासंदर्भात संबंधित विभागाच्या स्तरावर खातरजमा करावी, अश्या सूचना सामान्य प्रशासन विभागाकडून देण्यात आल्या आहेत. उच्च शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील विद्यापीठांमधील कर्मचाऱ्यांच्या संदर्भात संबंधित विद्यापीठ हे नियुक्ती प्राधिकारी आहे. तसेच अनुदानित महाविद्यालयाच्या संदर्भात संबंधित महाविद्यालयाचे संचालक मंडळ हे नियुक्ती प्राधिकारी आहेत. यास्तव पदभरती करताना The Rights of persons with Disabilities Act २०१६ (RPwD Act,२०१६) Section-३४ मधील तरतुदीनुसार सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२९/०५/२०१९ शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली कार्यपध्दती आणि दि.२५/०१/२०२४ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचना यांची काटेकोर अंमलबजावणी करुन दिव्यांगाकरिता नियमानुसार पदे आरक्षित ठेवावी, असे सर्व संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांना उक्त शासन परिपत्रकान्वये कळविले आहे.<br>दि.०७/०२/२०२४ रोजीच्या मान्य टिपणीन्वये उपरोक्त शासन परिपत्रक विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो / विशेष कक्ष / २०२४ / १४१८, दि.१५/०२/२०२४ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालये व आस्थापना विभागास कळविण्यात आले आहे.<br>सबब, अध्यापक पदभरती करताना दिव्यांगाकरिता समांतर आरक्षणाची अंमलबजावणी करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०२४ / ई ७२२५५० / विशि-१, दि.२९/०१/२०२४ माहितीस्तव. | विशेष कक्ष विभाग |
| ठराव: | **अध्यापक पदभरती करताना दिव्यांगाकरिता समांतर आरक्षणाची अंमलबजावणी करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे परिपत्रक क्र. संकिर्ण २०२४/ई ७२२५५०/विशि-१, दि.२९/०१/२०२४ ची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(५)] | **राज्यात शासन सरळसेवा पदभरतीमध्ये समांतर आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबतची सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक: राआधो ४०२४ / प्र.क्र.१४ / १६-अ, दि.२५/०१/२०२४ माहितीस्तव.**<br>टिपणी: उक्त शासन परिपत्रकान्वये शासन सेवेत सरळसेवा पदभरती करताना, सामजिक आरक्षण निश्चितीनंतर, समांतर आरक्षणाची पदे विहित टक्केवारीनुसार आरक्षित ठेवून सदर पदांवर खालील कार्यपध्दतीनुसार पदभरती करण्याबाबत प्रशासकीय विभाग तसेच संबंधित नियुक्ती प्राधिकारी/आस्थापना यांनी काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे. त्यानुसार समांतर आरक्षणाची पदे राखून ठेवण्याबाबत तसेच नियुक्तीबाबत खालील कार्यपध्दतीनुसार अंमलबजाणी करण्याबाबत दक्षता घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे.<br>१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील पदभरती प्रक्रियांमध्ये महिला, अनाथ, दिव्यांग, माजी सैनिक, खेळाडु आरक्षणासह प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, पदवीधर अंशकालीन या घटकांसाठी उक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार पदे आरक्षित ठेवावी.<br>२) दिव्यांग व अनाथ आरक्षण वगळता अन्य समांतर आरक्षण घटकांसाठी कंप्पीकृत समांतर आरक्षण धोरण अवलंबण्यात यावे. रिक्त पदांच्या प्रमाणा समांतर आरक्षणाच्या घटक निहाय टक्केवारीनुसार त्या त्या सामाजिक प्रवर्गात पदे राखून ठेवण्यात यावी.<br>३) दिव्यांग व अनाथ आरक्षणासाठी एकुण समांतर धोरणानुसार भरावयाच्या एकुण रिक्त पदांवर अनुक्रमे ४% व १% या प्रमाणात पदे राखून ठेवावीत. ती स्वंतत्र दर्शविण्यात यावीत. मात्र निवड झालेल्या उमेदवारांना त ज्या सामाजिक अथवा खुल्या प्रवर्गातील असतील त्या सामाजिक/खुल्या प्रवर्गात सामावून घेण्यात यावे.<br>४) समांतर आरक्षणासाठी राखीव असलेल्या जागांवर नियुक्तीसाठी खालील कार्यपध्दती अनुसरण्यात यावी.<br>अ) प्रथम टप्पा- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेच्या निकषानुसार निवड यादी तयार करावी. या यादीत खुल्या प्रवर्गात गुणवत्तेच्या आरधारावर मागासवर्गीय उमेदवारांचीही समावेश होईल. या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर समांतर आरक्षणाची पदे भरण्याकरिता सदर यादीतील आवश्यक पर्याप्त संख्येइतके शेवटचे उमेदवार वगळून पात्र उमेदवार घेणे आवश्यक आहे.<br>ब) दुसरा टप्पा- त्यांनतर प्रत्ये सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड याद्या तयार कराव्यात. (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा अ मध्ये सामील झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे<br>क) तिसरा टप्पा- वरील ब नुसार तयार करण्यात आलेला याद्यांमध्ये सामाजिक आरक्षणातील प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार अ येथे विशद केलेल्या कार्यपध्दतीनुसार समांतर आरक्षणाचे पुरेसे उमेदवार समाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गातर्गत रहावे. | विशेष कक्ष विभाग |

५) समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत असून, सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येऊ नये.

६) समांतर आरक्षण एका सामाजिक आरक्षण प्रवर्गातून दुसऱ्या सामाजिक आरक्षण प्रवर्गात स्थलांतरित करता येणार नाही. एका सामाजिक आरक्षणांतर्गत समांतर आरक्षणासाठी घटकनिहाय राखून ठेवण्यात आलेल्या जागेवर सुयोग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे संबधित समांतर आरक्षण घटकासाठी निश्चित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन, त्या त्या सामाजिक प्रवर्गात गुणवत्तेवर देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

७) शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण अंमलबजावणीसाठी संबंधित प्रशासकीय विभागांनी दिलेल्या सूचनांनुसार वरीलप्रमाणे काटेकोरपणे कार्यवाही संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांनी करावी.

८) प्रत्येक पदभरतीवेळी भरावयाच्या रिक्त पदांवर समांतर आरक्षणातील सर्व घटकांसाठी विहित केलेल्या प्रमाणानुसार पदे दर्शविण्यात येतील याची खातरजमा नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी करणे आवश्यक आहे.

तसेच खालीलप्रमाणे समांतर आरक्षणाचा टक्केवारी दर्शविणारा तक्ता दर्शविला आहे.

| अ. क्र. | समांतर आरक्षण | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | महिला | ३०% |
| २. | माजी सैनिक (फक्त क व ड च्या पदांवर) | १५% |
| ३. | दिव्यांग | ४% |
| ४. | खेळाडू | ५% |
| ५. | प्रकल्पग्रस्त (फक्त क व ड च्या पदांवर) | ५% |
| ६. | भूकंपग्रस्त (फक्त क व ड च्या पदांवर) | २% |
| ७. | पदवीधर अंशकालीन (फक्त क व ड च्या पदांवर) | १०% |
| ८. | अनाथ | १% |
| | **एकूण आरक्षण** | **७२%** |

दि.२९/०१/२०२४ रोजीच्या मान्य टिपणीन्वये उपरोक्त शासन निर्णय विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो / विशेष कक्ष / २०२४ / ११३५, दि.०७/०२/२०२४ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालये व आस्थापना विभागास कळविण्यात आले आहे.

सबब, राज्यात शासन सरळसेवा पदभरतीमध्ये समांतर आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक: राआधो ४०२४/प्र.क्र.१४/१६-अ, दि.२५/०१/२०२४ माहितीस्तव.

ठराव: **राज्यात शासन सरळसेवा पदभरतीमध्ये समांतर आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबतची सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक: राआधो ४०२४ / प्र.क्र.१४ / १६-अ, दि.२५/०१/२०२४ ची नोंद घेण्यात आली.**

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(६)] | **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदूनामावली विहित करणेबाबत सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०२४, प्र.क्र.७५ / १६-क, दि.२७/०२/२०२४ माहितीस्तव.**<br>टिपणी: उक्त शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात आले आहे.<br>१) महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गासाठी भारतातील राज्य घटनेच्या कलम १५ (४), १५ (५), १६ (४), व ४६ नुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (एसईबीसी) (Socially and Educationally Backward Classes) (SEBC) असा नवीन वर्ग तयार करण्यात आला असून या वर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे. सदर अधिनियमातील कलम ५ (१) अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (एसईबीसी) (Socially and Educationally Backward Classes) (SEBC) वर्गासाठी, राज्याच्या अखत्यारीतील लोकसेवांमधील शासकीय व निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १० टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. त्यानुसार, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०२१ प्र.क्र.३८७/१६१६-ब (ए) दि.६/०७/२०२१ च्या अन्वये विहित करण्यात आलेली बिंदूनामावली सुधारीत करण्यात येत आहे.<br>२) अधिनियम प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून, म्हणजेच दि.२६, फेब्रुवारी, २०२४ या दिनांकापासून शासकीय/निमशासकीय सेवेतील भरतीसंदर्भात सोबतच्या परिशिष्ट-अ नुसार विहित करण्यात येत असलेल्या सुधारित बिंदूनामावलीचा अवलंब करण्यात यावा.<br>३) सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गासाठी (एसईबीसी) अधिनियमातील कलम ६ अनुसार गुणवत्तेवर नियुक्त झालेल्या सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांची संबंधित वर्गाच्या आरक्षित पदावर गणना करण्यात येऊ नये. त्यांची नियुक्ती संबंधित आरक्षण बिंदुवर दर्शवू नये. त्यांची नोंद खुल्या प्रवर्गातील बिंदुवर दर्शविण्यात यावी.<br>४) सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गासाठी (एसईबीसी) सरळसेवेने भरण्यात येणारी १० टक्के आरक्षणाची पदे दि.२६ फेब्रुवारी, २०२४ पासून भरणे आवश्यक आहे. त्यामुळे संवर्गामध्ये दि.२६ फेब्रुवारी, २०२४ रोजी रिक्त असणारी पदे व त्यानंतर सरळसेवेच्या कोटयातील संभाव्य रिक्त होणारी पदे विचारात घेऊन चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षाकरिता सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) या वर्गाकरीता आरक्षणाची गणना करतांना, सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.<br>तसेच, संदर्भाधीन क्रमांक ४ येथील शासन निर्णय व संदर्भाधीन क्र. ५ येथील शासन शुध्दीपत्रक अधिक्रमित करण्यात येत आहे. ईडब्ल्यूएस प्रवर्गाकरीता आरक्षणाची गणना करताना, सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा. | विशेष कक्ष विभाग |

५) संदर्भ क्र. १ येथील सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ मधील कलम १८ (१) नुसार, या अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी म्हणजेच दि.२६ फेब्रुवारी, २०२४ पूर्वीच सरळसेवा भरतीमधील निवड प्रक्रिया सुरु झाली असेल, अशा प्रकरणांना या अध्यादेशाच्या तरतुदी लागू होणार नाहीत. अशा प्रकरणांच्या बाबतीत, सदर अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी जे शासकीय आदेश लागू होते आणि आरक्षण अधिनियम २००१ मधील ज्या तरतुदी लागू होत्या, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६) यापूढे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सरळसेवा भरतीसाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करावा. पूर्वीपासून आरक्षण लागू असलेल्या मागासप्रवर्गांचा अनुशेष असल्यास तो सरळसेवा भरतीच्यावेळी विचारात घेण्यात यावा.

७) सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्त्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

८) सरळसेवेव्दारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत, वरील प्रमाणे बिंदुनामावलीचा अवलंब करतांना, सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

९) हे आदेश दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ पासून अंमलात येतील.

दि.२८/०२/२०२४ रोजीच्या मान्य टिपणीन्वये उपरोक्त शासन परिपत्रक विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो / विशेष कक्ष / २०२४ / २१८५, दि.०६/०३/२०२४ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालये व आस्थापना विभागास कळविण्यात आले आहे.

सबब, सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदूनामावली विहित करणेबाबत सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०२४ / प्र.क्र.७५ / १६-क, दि.२७/०२/२०२४ रोजीचे शासन निर्णय माहितीस्तव.

ठराव: **सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदूनामावली विहित करणेबाबत सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०२४ प्र.क्र.७५/१६-क, दि.२७/०२/२०२४ ची नोंद घेण्यात आली.**

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ७(७) ] | **प्रस्तुत विद्यापीठाअंतर्गत Institute of Differently Abled या अभ्यासक्रमाचे संकुल केंद्रीय दिव्यांग मंत्रालय, नवी दिल्ली व महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय, मुंबई यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार नव्याने संकुल स्थापित करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाअंतर्गत Institute of Differently Abled संकुल स्थापित करण्याचा प्रस्ताव व पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम (UG/PG Courses Syllabus) याकरिता मा. कुलगुरु महोदयांनी ७ सदस्य समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीच्या वेळोवेळी बैठका संपन्न होवून School of Differently Abled प्रस्ताव व अभ्यासक्रम समितीकडून आयक्युएसी विभागास प्राप्त झाला आहे. सदरचा प्रस्ताव व अभ्यासक्रम दि.१८/०४/२०२४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत ठेवला असता, विद्यापरिषदेने ठराव क्र.९६(१२) नुसार मान्य करुन व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.<br>सबब, Institute of Differently Abled संकुल स्थापित करण्याचा प्रस्ताव व पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम (UG/PG Courses Syllabus) बाबत विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ. | आयक्युएसी विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठांतर्गत Institute of Differently Abled या अभ्यासक्रमाचे संकुल केंद्रीय दिव्यांग मंत्रालय, नवी दिल्ली व महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालय, मुंबई यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार नव्याने संकुल स्थापित करण्यास व पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम (UG/PG Courses Syllabus) बाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते दुरुस्तीसह मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ७(८)] | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर सामाजिकशास्त्रे संकुलातील प्रा. डॉ. गौतम सुभाना कांबळे यांच्या कॅस अंतर्गत Academic Level १४ to १५ (प्राध्यापक पदावरुन वरिष्ठ प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील इतक्या विषयतज्ज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके विषयतज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परिसर सामाजिकशास्त्रे संकुलातील प्राध्यापक डॉ. गौतम सुभाना कांबळे यांचा कॅस अंतर्गत Academic Level १४ to १५ (प्राध्यापक पदावरुन वरिष्ठ प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी प्रस्ताव प्राप्त झाला असून, सदर प्रस्तावाची मा. कुलगुरु महोदयांनी गठीत करुन दिलेल्या त्रिसदस्यीय छाननी समितीकडून छाननी करण्यात आली असून, त्यांच्या कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या पुढील प्रक्रियेसाठी शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ नुसार गठीत करावयाच्या Selection Committee मधील क्र. v नुसार ज्या विषयासाठी अध्यापकांची निवड करावयाची असेल अशा विषयाचे विशेष ज्ञान असलेल्या, विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले तीनपेक्षा अधिक नसतील इतक्या तज्ज्ञांची निवड करावयाची तरतूद विशद केली आहे.<br>त्यानुसार प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा यांचेकडून विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या अर्थशास्त्र विषयातील वरिष्ठ प्राध्यापक किंवा १० वर्षांचा अनुभव असलेल्या प्राध्यापक दर्जाच्या विषयतज्ज्ञांची यादी मागविण्यात आली होती.<br>त्यानुषंगाने सदर विषय तज्ज्ञांची यादी विद्यापरिषदेच्या दि.१८/०४/२०२४ रोजीच्या बैठकीत विषय क्र. ९४ अन्वये विषय विचारार्थ ठेवला असता, त्यावर पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.<br>"विद्यापीठ परिसर सामाजिकशास्त्रे संकुलातील डॉ. जी. एस. कांबळे यांच्या कॅस अंतर्गत Academic Level १४ to १५ (प्राध्यापक पदावरुन वरिष्ठ प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये विषयतज्ज्ञांच्या यादीतील अ. क्र. ०१ ते ०६ विषयतज्ज्ञांची शिफारस व्यवस्थापन परिषदेकडे सर्वानुमते करण्यात आली."<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसर सामाजिकशास्त्रे संकुलातील प्रा. डॉ. गौतम सुभाना कांबळे यांच्या कॅस अंतर्गत Academic Level १४ to १५ (प्राध्यापक पदावरुन वरिष्ठ प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील इतक्या विषयतज्ज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके विषयतज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर सामाजिकशास्त्रे संकुलातील प्रा. डॉ. गौतम सुभाना कांबळे यांच्या कॅस अंतर्गत Academic Level १४ to १५ (प्राध्यापक पदावरुन वरिष्ठ प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विषयतज्ज्ञांच्या नामिकेतून खालील तीन विषयतज्ज्ञांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**<br>**१. प्रा. डॉ. विलास आढाव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे**<br>**२. प्रा. डॉ. के. एस. इंगले, एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई**<br>**३. प्रा. डॉ. कैलाश थावरे, गोखले इन्स्टिट्युट ऑफ इकॉनॉमिक्स ॲन्ड पॉलिटिक्स, पुणे**<br>**तसेच सदर विषयतज्ज्ञांमधून एखादा विषयतज्ज्ञ उपलब्ध न झाल्यास पर्यायी नावे घेण्यास मा. कुलगुरुमहोदय यांना सर्वाधिकार देण्यात आले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(९)] | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर सामाजिकशास्त्रे संकुलातील डॉ. सौ. माया जगदीश पाटील आणि डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर यांच्या कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A (सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील इतक्या विषयतज्ज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके विषयतज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परिसर सामाजिकशास्त्रे संकुलातील डॉ. सौ. माया जगदीश पाटील आणि डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर यांचा कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A (सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी प्रस्ताव प्राप्त झाला असून, सदर प्रस्तावाची मा. कुलगुरु महोदयांनी गठीत करुन दिलेल्या त्रिसदस्यीय छाननी समितीकडून छाननी करण्यात आली असून, त्यांच्या कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या पुढील प्रक्रियेसाठी शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ नुसार गठीत करावयाच्या Selection Committee मधील क्र. v नुसार ज्या विषयासाठी अध्यापकांची निवड करावयाची असेल अशा विषयाचे विशेष ज्ञान असलेल्या, विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले तीनपेक्षा अधिक नसतील इतक्या तज्ज्ञांची निवड करावयाची तरतूद विशद केली आहे.<br>त्यानुसार प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा यांचेकडून विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या प्राचीन भारतीय संस्कृतीचा इतिहास आणि पुरातत्वशास्त्र विषयातील विषयतज्ज्ञांची यादी मागविण्यात आली होती.<br>त्यानुषंगाने सदर विषय तज्ज्ञांची यादी विद्यापरिषदेच्या दि. १८/०४/२०२४ रोजीच्या बैठकीत विषय क्र. ९३ अन्वये विषय विचारार्थ ठेवला असता, त्यावर पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.<br>"विद्यापीठ परिसर सामाजिकशास्त्रे संकुलातील डॉ.सौ.एम.जे.पाटील आणि डॉ.पी.एन.कोळेकर यांच्या कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A (सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये विषयतज्ज्ञांच्या यादीतील अ. क्र. ०१ ते ०६ विषयतज्ज्ञांची शिफारस व्यवस्थापन परिषदेकडे सर्वानुमते करण्यात आली."<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसर सामाजिकशास्त्रे संकुलातील डॉ. सौ. माया जगदीश पाटील आणि डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर यांच्या कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A (सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील इतक्या विषयतज्ज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके विषयतज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर सामाजिकशास्त्रे संकुलातील डॉ. सौ. माया जगदीश पाटील आणि डॉ. प्रभाकर कोळेकर यांच्या कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A (सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विषयतज्ज्ञांच्या नामिकेतून खालील तीन विषयतज्ज्ञांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**<br>**१. प्रा. डॉ. पांडुरंग साबळे, डेक्कन कॉलेज, अभिमत विद्यापीठ, येरवडा, पुणे**<br>**२. प्रा. डॉ. धनाजी बाबुराव मसाळ, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा**<br>**3. प्रा. डॉ. देविदास वायदंडे, एम. एस. काकडे कॉलेज, सोमेश्वर नगर, बारामती**<br>**तसेच सदर विषयतज्ज्ञांमधून एखादा विषयतज्ज्ञ उपलब्ध न झाल्यास पर्यायी नावे घेण्यास मा. कुलगुरुमहोदय यांना सर्वाधिकार देण्यात आले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [७(१०)] | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर भूशास्त्र संकुलातील डॉ. विनायक पोपट धुळप यांच्या कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A (सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील इतक्या विषयतज्ज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके विषयतज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परिसर भूशास्त्र संकुलातील डॉ. विनायक पोपट धुळप यांचा कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A (सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी प्रस्ताव प्राप्त झाला असून, सदर प्रस्तावाची मा. कुलगुरु महोदयांनी गठीत करुन दिलेल्या त्रिसदस्यीय छाननी समितीकडून छाननी करण्यात आली असून, त्यांच्या कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या पुढील प्रक्रियेसाठी शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ नुसार गठीत करावयाच्या Selection Committee मधील क्र. v नुसार ज्या विषयासाठी अध्यापकांची निवड करावयाची असेल अशा विषयाचे विशेष ज्ञान असलेल्या, विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले तीनपेक्षा अधिक नसतील इतक्या तज्ज्ञांची निवड करावयाची तरतूद विशद केली आहे.<br>त्यानुसार प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा यांचेकडून विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या पर्यावरणशास्त्र विषयातील विषयतज्ज्ञांची यादी मागविण्यात आली होती.<br>त्यानुषंगाने सदर विषय तज्ज्ञांची यादी विद्यापरिषदेच्या दि. १८/०४/२०२४ रोजीच्या बैठकीत विषय क्र. ९५ अन्वये विषय विचारार्थ ठेवला असता, त्यावर पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.<br>"विद्यापीठ परिसर भूशास्त्र संकुलातील डॉ. व्ही. पी. धुळप यांच्या कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A (सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये विषयतज्ज्ञांच्या यादीतील अ. क्र. ०१ ते ०६ विषयतज्ज्ञांची शिफारस व्यवस्थापन परिषदेकडे सर्वानुमते करण्यात आली."<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसर भूशास्त्र संकुलातील डॉ. विनायक पोपट धुळप यांच्या कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A (सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील इतक्या विषयतज्ज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके विषयतज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर भूशास्त्र संकुलातील डॉ. विनायक पोपट धुळप यांच्या कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A (सहायक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक पदी) पदोन्नतीसाठी राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विषयतज्ज्ञांच्या नामिकेतून खालील तीन विषयतज्ज्ञांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**<br>**१. डॉ. दिपाली निंबाळकर, वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी, ता. हवेली, जि. पुणे**<br>**२. प्रा.एस.आर. थोरात, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**<br>**३. डॉ. सतिश पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर**<br>**तसेच सदर विषयतज्ज्ञांमधून एखादा विषयतज्ज्ञ उपलब्ध न झाल्यास पर्यायी नावे घेण्यास मा. कुलगुरुमहोदय यांना सर्वाधिकार देण्यात आले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ७(११)] | **दि.१५/०४/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.१५/०४/२०२४ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>विद्यापीठ परिनियम S.३३९(f) दि.१५/०४/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br>सबब, दि.१५/०४/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **दि.१५/०४/२०२४ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ७(१२)] | Samarth Implementation Committee वर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | संगणकशास्त्र संकुल |
| ठराव: | Samarth Implementation Committee वर सर्वानुमते खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले. | |

| अ.क्र. | तपशील | नामनिर्देशन |
|---|---|---|
| १. | विद्यापरिषद सदस्य | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड |
| २. | व्यवस्थापन परिषद सदस्य | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे |
| ३. | वित्त व लेखा समिती | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत |
| ४. | इतर | संचालक, आयक्यूएसी |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

30/4/2024.
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद